# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४१** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३०६** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.११/०७/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी– ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४० चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.११/०७/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी– ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४० चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.११/०७/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी– ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४० चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-३०७** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./पर्यावरण/१३३/२०२५-२६ दि.१२/०८/२०२५
३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.०६/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.०६/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. **अतिरीक्त** आयुक्त यांचा दि.०६/०८/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०७/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहरातील चौक/दुभाजक खाजगी संस्थांकडून सुशोभित करणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहरातील विविध रस्ता दुभाजक खाजगी संस्था उदयोजक यांना सुशोभिकरणासाठी मनपा प्रशासकीय ठराव क्रमांक २८९ दि.१३/०६/२०२५ अन्वये देण्यात आलेले आहेत यात नंदिनी बेंडाळे शाळा ते अॅक्सिस बँक ते रेस्ट हाऊस कॉर्नर पर्यंतचा डिव्हायडर जी.एम. फाउंडेशन यांना देण्यात आलेला आहे. जी.एम. फाउंडेशन यांचे कडील पत्र दि.०४/०८/२०२५ नुसार त्यांनी नंदिनी शाळा ते कोर्ट चौक पर्यंतचे डिव्हायडर सुशोभिकरण करणार असल्याचे कळविले आहे. तसेच सुप्रीम इंडस्ट्रीज यांच्याकडील पत्र दि.०४/०८/२०२५ नुसार त्यांनी कोर्ट चौक ते रेस्ट हाऊस कॉर्नर पर्यंतचे डिव्हायडर जी.एम फाउंडेशनने दिलेल्या डिझाईन नुसार पुढे करणार आहे. जेणेकरुन या मार्गाचे व चौकाचे डिझाईन मध्ये फरक पडणार नाही व चौक व आजुबाजूचे डिव्हायडर सारखेच दिसतील या आशयाचे त्यांच्या पत्रात नमूद आहे पूर्वीचे ठरावानुसार नंदिनीबाई ते रेस्ट हाऊस पर्यंतचे डिव्हायडर सुशोभिकरणाचे काम जीएम फाउंडेशन यांना दिलेले होते तेच काम आता दोन उदयोजक संस्था यांना विभागून दयावे लागेल असे करीत असताना डिझाईन मध्ये कोणताही फरक होणार नसल्याने सुप्रीम इंडस्ट्रीज यांना त्याच अटी शर्तीवर कोर्ट चौक ते रेस्ट हाऊस कॉर्नर पर्यंतचे डिव्हायडर तसेच जीएम फाउंडेशन यांना नंदिनीबाई बेंडाळे शाळा ते कोर्ट चौक पर्यंतचे डिव्हायडर सुशोभिकरणास देणेस हरकत नसावी. जीएम फाउंडेशन चे डिझाईनला चौक सुशोभिकरण समितीने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे त्याच धर्तीवर सुप्रीम इंडस्ट्रीज करणार आहे सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-३०८** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/४५४/२०२५-२६ दि.२८/०७/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.०९/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. अतिरिक्तआयुक्त यांचा दि.२३/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.२५/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान/नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत पिंप्राळा शिवार स.नं.३३८ ते स.नं.३४२ पर्यंत (पिंप्राळा व निमखेडी मधील शिवरोड) १८ मी. रुंद विकास योजना व या रस्त्यास राष्ट्रीय महामार्गापासुन जोडणारा २४ मी. रुंद विकास योजना रस्ता बाजुच्या गटारीसह तयार करणे कामाची निश्चिती करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सह आयुक्त, न.वि.शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.जा.क्रं./न.वि.शाखा/न.पा.-१/ई ऑफीस/कॉम्प्यु.नं.२०३००८६/२०२५ दि.१९/०६/२०२५ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान/नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत पिंप्राळा शिवार स.नं.३३८ ते स.नं.३४२ पर्यंत (पिंप्राळा व निमखेडी मधील शिवरोड) १८ मी. रुंद विकास योजना व या रस्त्यास राष्ट्रीय महामार्गापासुन जोडणारा २४ मी. रुंद विकास योजना रस्ता बाजुच्या गटारीसह तयार करणे कामाचे रक्कम रु.४ कोटी मात्रचा प्रस्ताव तयार करुन परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. या कामाकरीता मा.ना.गुलाबराव पाटील, मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री जळगांव यांचे कडील पत्र क्रं.मा.मंत्री/पा.पु.व स्व./टिप्पणी/२१० दिनांक १०/०६/२०२५ अन्वये शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाची महासभेत निश्चिती करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर कामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस सादर करता येईल. त्याअनुषंगाने सदर कामाचा प्रस्ताव महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-३०९** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./न.र./६००/२०२५-२६ दि.०१/०८/२०२५
३. **रचना सहाय्यक** यांचा दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि. ३०/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मौजे मेहरुण स.नं.१८० पैकी या जमिनीस नाविकास विभागातुन वगळून रहीवास विभागात समाविष्ठ होणे कामी शासनास कलम ३७ अन्वयेचा फेरबदलाचा प्रस्तावा बाबत.

अर्जदार चंद्रकांत भागवत पाटील व इतर यांचेकडील दि.२२/०७/२०२५ अन्वयेचा अर्ज या कार्यालयाकडेस प्राप्त आवक क्र.३७३२ दि.२२/०७/२०२५ तसेच आयुक्त कार्यालयामार्फत प्राप्त आवक क्र.९१८ दि.२३/०७/२०२५ अन्वये प्राप्त अर्ज.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अर्जदार चंद्रकांत भागवत पाटील व इतर यांचेकडील दि.२२/०७/२०२५ अन्वयेचा अर्ज या कार्यालयाकडेस प्राप्त आवक क्र.३७३२ दि.२२/०७/२०२५ तसेच आयुक्त कार्यालयामार्फत प्राप्त आवक क्र.९१८ दि.२३/०७/२०२५ अन्वये प्राप्त अर्ज या कार्यालयाकडेस प्राप्त असुन संबंधीत अर्जदार यांनी त्या व्दारे मौजे मेहरुण येथील स.नं.१८० पैकी या मालकीची जमीन नाविकास विभागातुन वगळुन रहीवास विभागात समाविष्ठ होणे बाबत विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिके करीता शासनाने वाढीव हद्दीची विकास योजनेला शासन अधिसुचना क्रं.क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर १४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये विकास योजना (वाढीव हद्द) भागशः मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर १०२ (ए)/०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आहे.

उक्त मंजुर विकास योजनेमध्ये सदर मेहरुण स.नं.१८० पैकी ही जमीन विदयमान अंबरझरा तलाव असे नामनिर्देशन दर्शविण्यात आल्याने अर्जदार यांचे विनंती अर्जानुसार व विकास योजना मंजुरीचे अधिसुचनेतील तळटीप-४ मध्ये नमुद असल्यानुसार तसेच प्रचलित एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियमन क्र.२.५ नुसार देणेत आलेल्या अधिकारानुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केलेल्या ड्राफ्टसमन एरर दुरुस्ती होणेचे प्रस्तावास संचनालयाकडील जा.क्र.वि.यो.जळगांव (वा.६)/ मौ.मेहरुण/स.नं.१८०पै/आरेखीकीय चुक/प्र.क्र.१३३८/टीपीव्ही-४/३७७१ दिनांक २७/०६/२०२५ अन्वये आरेखीकीय त्रुटी असल्याने मौजे मेहरुण स.नं.१८०/१+२+३ ह्या जागेस विदयमान अंबरझरा तलाव ह्या नामनिर्देशनातुन वगळुन जमीन ना-विकास विभागात समाविष्ठ करणेकामी सविस्तर आदेश निर्गमित करुन त्याचे भाग नकाशाच्या स्वाक्षांकित प्रती आदेश संबंधितांना कळवावे असे आदेशित करण्यात आले आहे.

तद्नंतर उक्त मंजुर विकास योजनेतील आयुक्त महानगरपालिका ह्यांना विनियमन २.५ नुसार प्राप्त अधिकारानुसार आदेश क्र.जशमनपा/नर/५३३/२०२५-२६ दिनांक २२/०७/२०२५ अन्वये अर्जदाराचे मौजे मेहरुण स.नं.१८०/१, १८०/२ व १८०/३ (मोजणी नकाशाप्रमाणे) क्षेत्र हे. ३.८४ आर क्षेत्रास अंबरझरा तलाव मधुन वगळुन ना-विकास विभाग असे नामनिर्देशन करणेत आले आहे तसेच ह्याबाबत आरेखीकीय त्रुटी दुरुस्ती केलेला भाग नकाशा प्रमाणित करण्यात आला आहे. त्यामुळे सदर जमीन आता ना-विकास विभागात समाविष्ठ करणेत आलेली आहे.

सदर जमीन मंजुर विकास योजने मधील सेक्टर नंबर ७ मध्ये स्थित असुन विकास योजना (वाढीव हद्द) चा दिनांक १०/०८/२००४ चे अधिसुचनेमध्ये सेक्टर नंबर ७ हा संपुर्णत: ना-विकास विभागात दर्शविण्यात आलेला आहे.

अर्जदार यांनी त्यांचेकडील अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे **" मंजुर विकास योजना नकाशाचे अवलोकन करता जमिनीचे पुर्वेस** १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता ज्यात आमचे जमिनीस रुंदीकरण दर्शविलेले आहे आणि त्या पलिकडे रहिवास विभाग तसेच उत्तरेस रहिवास विभाग क्षेत्र आहे. त्यामुळे रहिवास विभागाची वर्दळ असल्याने शेती करणे शक्य होत नाही. सबब लगत वापरा प्रमाणे जमिन रहिवास विभागात समाविष्ठ होणे कामी सदर प्रस्ताव सादर केला आहे.

तसेच विकास योजना तयार करतांना सदर ड्राफ्टसमन एरर (आरेखीकीय चुक) झाली नसती तर आमची जमीन निश्चितच रहिवास विभागात समाविष्ठ असती ही वस्तुस्थिती आहे. आम्हास सदर जमीन ना-विकास विभागात समाविष्ठ जमीन रहिवास प्रयोजनार्थ विकसीत करावयाची आहे. मात्र जवळपास सन १९९६ साली प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाले पासुन २७ वर्ष कालावधी होऊनही जमिनीचा विकास करणे पासुन आम्ही वंचित राहत आहोत. सबब सदर जमीन ना-विकास विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ठ करणे कामी वरील सर्व उपस्थित मुद्दयांचे संदर्भीय अर्जाव्दारे अवलोकन केल्यास सदर मिळकत ना-विकास विभागातुन वगळेस पात्र ठरत आहे. सबब सदर मिळकत ना-विकास विभागातुन वगळण्यात येऊन रहिवास विभागात समाविष्ठ होण्याची कार्यवाही करणेत यावी. " या प्रमाणे अर्जदार यांनी विनंती अर्ज दिलेला आहे.

प्रश्नाधीन जमिनीची प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ निरीक्षण केले असता सदर जमीन सेक्टर नं.७ चे संपुर्णत: पश्चिम बाजुस एकीकडे आहे आणि सेक्टर नंबर ५ चे लगत असुन सदर जमिनीच्या पुर्वेस १८.०० मी रुंद विकास योजना रस्ता व त्या पलिकडे रहिवास वापर व उत्तरेस सुध्दा रहिवास वापर असुन त्या अनुषंगाने अभिन्यास मंजुर झाले असुन दोन्ही बाजुचा भाग विकसीत झाला आहे व प्रत्यक्षात बांधकामे होऊन रहिवास वापर सुरु आहे.

तरी अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमीन ना-विकास विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ठ करावयाची झाल्यास नियोजन प्राधिकरण या नात्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करावी लागेल.

त्या अनुषंगाने उक्त जमिनीवरील १८.०० मी.रुंद विकास योजना रस्त्याखालील रुंदीकरणाच्या जागेच्या आरक्षणाच्या स्थितीत व संरेखनात कोणताही बदल न करता अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमीन ना-विकास विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ठ करावयाची झाल्यास सर्वप्रथम फेरबदलास मान्यता करीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने सर्व प्रथम महासभेची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:-३१०** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/५०४/२०२५-२६ दि.०६/०८/२०२५
३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.०९/०७/२०२५ व दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. अतिरीक्त आयुक्त यांचा दि. ०७/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि. ०१/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत प्र.क्रं.५ व ६ रस्ते डांबरीकरण करणे त्यापैकी १) प्र.क्र.५ रेल्वे स्टेशन ते नेहरु चौक रस्ता डांबरीकरण करणे., २)प्र.क्रं.५ काबरा टायपिंग ते नविन सरस्वती डेअरी पर्यतचा दोन्ही बाजुस रस्ता डांबरीकरण करणे, ३)प्र.क्रं.५ जुनी एलआयसी कॉलनी ऑफीस ते जुना श्रीराम पंपापर्यंत नवजिवन सुपर शॉप समोरील रस्ता डांबरीकरण करणे, ४)प्र.क्रं.५ स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामाची सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा निधी अंतर्गत प्र.क्रं.५ व ६ रस्ते डांबरीकरण करणे त्यापैकी १) प्र.क्र.५ रेल्वे स्टेशन ते नेहरु चौक रस्ता डांबरीकरण करणे., २)प्र.क्रं.५ काबरा टायपिंग ते नविन सरस्वती डेअरी पर्यतचा दोन्ही बाजुस रस्ता डांबरीकरण करणे, ३)प्र.क्रं.५ जुनी एलआयसी कॉलनी ऑफीस ते जुना श्रीराम पंपापर्यंत नवजिवन सुपर शॉप समोरील रस्ता डांबरीकरण करणे, ४)प्र.क्रं.५ स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार समर्थ कंन्सट्रोवेल प्रा.लि. यांची सुरक्षा अनामत १) पावती क्रं.१००८५ दि.१८/०४/२०२२, २)पावती क्रं.१२३३३ दि.०२/०५/२०२२, ३)पावती क्रं.१३०१३ दि.२०/०४/२०२५, ४)पावती क्रं.१४०६ दि.२९/०४/२०२२ अन्वये रक्कम रु.८,८२,४०५/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

सदर कामी मक्तेदार यांचे निविदा दर सर्वात कमी आल्याने त्यांना पत्र क्रं.पवडी/१८६/३ दि.११/०१/२०२२ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला त्यानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशानुसार दिलेल्या मुदतीत दि.२४/०४/२०२२ रोजी पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.८,८२,४०५/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.६१५ दि.१५/०५/२०२५ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार मुख्यलेखाधिकारी यांचेकडुन मक्तेदार यांची जमा सुरक्षा अनामत मनपा खजिन्यात जमा आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविला असता त्यांनी सदरची सुरक्षा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी कराचे असल्यास महासभेची मान्यता घेवून जनरल फंडाकडे अदायगी करता देयक सादर करण्याबाबत सुचीत केलेले आहे. त्यानुसार सदरची जमा सुरक्षा अनामत मनपा लेखासंहिता २०११ चे कलम २९९ अन्वये महासभा/प्रशासक पुर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. शहर अभियंता यांनी कामांची खात्री करुनच देयक अदायगी बाबतची तजवीज करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:-३११** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा /विदयुत/१८७/२०२५-२६ दि.१८/०८/२०२५
३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.३०/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०४/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. उपायुक्त यांचा दि. ०४/०८/२०२५ चा अभिप्राय.
६. अतिरीक्त आयुक्त यांचा दि. ३१/०७/२०२५ चा अभिप्राय.
७. आयुक्त यांचा दि. ११/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** कवयित्री बहिणाबाई उदयान व सागर पार्क येथे बसविण्यात आलेल्या EV Charging Station येथे प्रति युनिट चार्जीग करीता २२ रुपये प्रति युनिट दरास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत कवयित्री बहिणाबाई उदयान व सागर पार्क येथे बसविण्यात आलेल्या EV Charging Station चार्ज करणेचे उद्देशाने EV Charging Station उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्याअनुषंगाने EV Charging Station चालू करणे पुर्वी युनिट निहाय दर निश्चित करणे आवश्यक आहे.

सदर EV Charging ठिकाणी EV चार्जर ओपरेट करणे करिता मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. सदर ठिकाणी तीन शिफ्ट मध्ये प्रत्येकी १ असे किमान ६ कर्मचारी बहिणाबाई उदयान व सागर पार्क या दोन्ही ठिकाणी आवश्यक असतील. एका कर्मचाऱ्याचे मासिक वेतन किमान १०,०००/- मात्र याप्रमाणे ६०,०००/- मात्रचा खर्च दरमहा महानगरपालिकेस करावा लागेल. तसेच सदर ठिकाणी प्रत्यक्ष EV Charging Station सुरु झालेनंतर ऑनलाईन पेमेंट करणे करिता बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच सदर दोन्ही ठिकाणी इंटरनेट सुविधा देखील आवश्यक असणार आहे त्याकामी दरमहा रक्कम रुपये २०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदयस्थितीत महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येत असलेल्या EV Charging Station याची देखभाल दुरुस्ती हि १ वर्षाकरीता मक्तेदार यांचेकडे असल्याने सदयस्थितीत वार्षिक देखभाल दुरुस्तीचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत त्यामुळे सदर दर हे १ वर्षाकरिता असून त्यामध्ये वर्षानिहाय वाढ करावी लागणार आहे. तसेच प्रतियुनिट दर निश्चित करतांना बहिणाबाई उदयान व सागर पार्क येथे EV Charging Station उभारणी कामी एकुण ४१ लक्ष मात्रचा खर्च होणार आहे, याचाही विचार लक्षात घ्यावा लागणार आहे.

३० kw EV Charging Station ठिकाणी Fourwheeler चार्ज करणे कामी साधारण खालीलप्रमाणे डेटाबेस उपलब्ध आहे.

| Vehicle type | Battery size | Energy to charge | Time on 30 kva charge |
|---|---|---|---|
| Small EV (Nexon,Tiago EV) | 30 kwh | 24 kwh(80%) | 50 min |
| Mid SUV(MG ZS EV) | 50 kwh | 40 kwh(80%) | 80 min |
| Large SUV(BYD,Kona) | 60 kwh | 48 kwh(80%) | 1.5 hrs |

जळगांव शहरातील सागर पार्क तसेच बहिणाबाई उदयान या ठिकाणी ३० KVA रेटिंगचे प्रत्येकी दोन असे एकुण ४ EV Charging Station ची उभारणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे तक्तानिहाय एक गाडी ८०% चार्ज होण्यासाठी साधारण २४ युनिट खर्च करावे लागतात. तरी महानगरपालिकेमार्फत साधारण २२ रुपये प्रती युनिट खर्च आकारणी केल्यास एक गाडी चार्ज केल्यावर २२ (दर) X २४ (युनिट) = ५२८ रुपये मात्र महानगरपालिकेस मिळतील. सदयस्थितीत जळगांव जिल्हयात एकूण ३३७ इलेक्ट्रिक वाहनांची नोंद RTO विभागाकडे आहे. त्यानुसार अंदाजित दिवसाला ६ इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग करण्यासाठी आल्यास अशाप्रकारे अंदाजित दिवसाला सहा गाडया ८०% चार्ज झाल्यास सरासरी ५२८ X ६ = ३१६८/- मात्र दिवसाला मिळतील व दरमहा ३१६८ X ३० = ९५०४०/- मात्र मिळु शकतात.

महानगरपालिकेच्या दोन पैकी बहिणाबाई उदयान येथे EV Charging Station चालविणे करिता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | Charget Capacity | MSEB Charges KWH | Manpower Charges | Internet Charges | Toatal Charges |
|---|---|---|---|---|---|
| प्रतियुनिट | 30 KVA | 14.62/- | 41.66 /- | 1.38 /- | 57.66 /- |
| प्रतिदिन | 30 KVA | 2105/- (14.62 X 24 X 6) | 1000 /- | 33.33 /- | 3138 /- Per Day |
| प्रतिमहिना | 30 KVA | 63158/- (14.62 X 24 X 6 X30) | 30000 /- (३ व्यक्ती ) | 1000 /- | 94158/- Per Month |

काही महानगरपालिकांचे EV Charging Station चे प्रति युनिट दर यांचे अवलोकन केले असता ते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नांव | प्रति युनिट दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | पॅनकार्ड क्लब रोड,पुणे | २३.५० |
| २ | पुणे सातारा रोड, अमरावती | २३.५० |
| ३ | संगमेश्वर | २३.५० |
| ४ | पुणे महानगरपालिका | २२.०० |
| ५ | जळगांव खाजगी चार्जिंग स्टेशन | २१.०० |
| ६ | घोले रोड, पुणे | १६.५३ |
| ७ | नाशिक महानगरपालिका | १६.६० |
| ८ | उल्हास नगर महानगरपालिका | १३.०० |

वरील तक्तानिहाय महानगरपालिकेस सरासरी ६ वाहने चार्जिंग करिता मनुष्यबळ व इतर चार्जेससह प्रतिमहिना बहिणाबाई गार्डन येथील EV Charging Station करिता मासिक खर्च रक्कम रुपये ९४,१५८/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच वरील प्रमाणे EV वाहने चार्जिंग करणेकामी दर रक्कम रु.२२ निश्चित केल्यास व ६ वाहने प्रतिदिवस चार्जिंग झाल्यास साधारण महानगरपालिकेस रक्कम रु.९५,०४०/- मात्र मासिक उत्पन्न मिळू शकते.

तरी काही महानगरपालिकांचे EV Charging Station चे प्रति युनिट दर लक्षात घेता प्रति युनिट २२ रुपये पेक्षा अधिक दर ठेवणे योग्य होणार नाहीत असे मत आहे. तसेच सदर दर निश्चित करतांना मनुष्यबळ खर्च/बांधकाम खर्च बाबत बांधकाम विभाग/प्रकल्प विभाग तसेच ऑनलाईन पेमेंट बाबत अर्थ विभाग व सदर EV Charging Station सुस्थितीत चालू ठेवणे कामी विदयुत विभाग, बांधकाम विभाग/ प्रकल्प विभाग, अर्थ विभाग यांचेशी समन्वय करणे कामी पर्यावरण विभाग यांचेही दर निश्चिती बाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे. याबाबत अभिप्राय घेणे कामी पर्यावरण विभाग यांचेकडे दराबाबत पुढील नियोजन करणे कामी नस्ती दिली असता त्यांचेमार्फत दराबाबत सविस्तर चर्चा करणे कामी दि.२८/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, उपायुक्त (पर्यावरण), शहर अभियंता, विदयुत विभाग प्रमुख यांना बैठकीस उपस्थित राहणेबाबत अवगत करण्यात आलेले होते. त्यानुसार सदर बैठकीत वरीलप्रमाणे प्रति युनिट दर २२ रुपये याप्रमाणे दर आकारणी कामी संपुर्ण विषयांकीत बाबी यावर चर्चा होवून व इतर ठिकाणचे दर, महानगरपालिकेस EV Charging Station उभारणीस आलेला खर्च तसेच विदयुत प्रति युनिट दर, तिन शिफ्ट निहाय मनुष्यबळ व अनुषंगीक खर्चाबाबत चर्चा होवून EV Charging Station कामी प्रति युनिट २२ रुपये दरास वरीलप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे. दि.२९/०७/२०२५ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने EV Charging Station बहिणाबाई उदयान येथे चारचाकी वाहन चार्जीग करणे कामी प्रति युनिट दर रक्कम रुपये २२ मात्र आकारणी करणे कामी मान्यतेस्तव सादर तसेच भविष्यात महावितरणकडील दरात वाढ झाल्यास व आपण पुरवित असलेल्या मनुष्यबळ व इतर अनुषंगीक खर्चास वाढ होण्याचे संभवीत असल्यास सदर प्रति युनिट दर २२ रुपये यात भविष्यात वाढ होवू शकते. तरी बहिणाबाई उदयान व सागर पार्क येथिल EV Charging करणे कामी प्रति युनिट रक्कम रुपये २२ रुपये मात्रच्या दरास महासभा / प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र.:-३१२** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./पर्यावरण विभाग/१३५/२०२५-२६ दि.१२/०८/२०२५
३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.२९/०६/२०२५ व दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. सहाय्यक आयुक्त यांचा दि. ०१/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०२/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा अभिप्राय.

**विषय :-** वृक्ष प्राधिकरण समिती ठराव क्र.११ दि.१३/०६/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार झाडे तोडणे, झाडे लावणे व झाड तोडतांना घेण्यात येणाऱ्या अनामत रकमेत वाढ करणेस मंजुरी मिळणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

वृक्ष प्राधिकरण समिती सभा क्र.११ दि.१३/०६/२०२५ रोजी संपन्न झाली. या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. वृक्ष तोडणे कामी स्थानीक वर्तमानपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करावी लागते. त्यासाठी प्रति झाड रु.५००/- याप्रमाणे जाहीर सुचना फी (ना परतावा फी) वसूल करण्यात येत होती. त्यात वाढ करुन रक्कम रु.७५०/- प्रति झाड जाहीर सुचना फी आकारण्यात यावी असे निश्चित करण्यात आली याप्रमाणे वाढ करणेस मान्यता मिळावी.
२. दि.१९/०६/२०२० च्या वृक्ष प्राधिकरण ठरावाच्या अनुषंगाने एक झाड तोडणे कामी परवानगी मिळाल्यास प्रति झाड रु.३००/- प्रमाणे एकूण पाच झाडे लावणे कामी रु.१५००/- तीन वर्षाकरीता अनामत म्हणून मनपा खजिन्यात जमा करण्यात येते, परंतू दि.१३/०६/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत सर्वानुमते असे धोरण ठरविण्यात आले की, यापुढे झाड तोडण्यास परवानगी देतांना त्या बदल्यात लावण्यात येणाऱ्या प्रत्येक झाडा प्रती रक्कम रु.४००/- प्रमाणे पाच झाडे लावणे कामी रक्कम रु.२०००/- अनामत व मनपा वृक्ष कर निधीमध्ये रु.१०००/- प्रति झाडप्रमाणे मनपा खजिन्यात जमा करण्यात यावी. (ना परतावा फी) सदरची अनामत रक्कम तीन वर्षांनी अर्जदाराने अनामत रक्कम परत करणे कामी स्वतंत्र अर्ज केल्यास त्यांनी लावलेल्या नविन झाडाचा संबंधित शाखा अभियंता यांनी पाहणी करुन तसा अहवाल सादर करावा व त्यानुसार अनामत रक्कम परत करणे कामी योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

| बाब | पुर्वीप्रमाणे | नविन प्रस्तावित |
|---|---|---|
| जाहिरात फी (ना परतावा) | रु. ५००/- प्रति झाड | रु. ७५०/- प्रति झाड |
| अनामत रक्कम | रु. ३००/- प्रति झाड प्रमाणे पाच झाडांकरीता रु.१५००/- | रु. ४००/- प्रति झाड प्रमाणे पाच झाडांकरीता रु.२०००/- |
| वृक्षकर निधी (ना परतावा) | - | रु.१०००/- प्रती झाड प्रमाणे |

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या दरांमध्ये वाढ करणेस मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र.:-३१३** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/८२/२०२५-२६ दि.१४/०८/२०२५

३. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.

४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.

५. आयुक्त यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत कामाची सुरक्षा अनामत परत करणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत कामाच्या निविदा प्रपत्रातील अटी शर्ती नुसार सुरक्षा अनामत परतावा करणेबाबत निविदेत कलम (१) च्या तरतुदीनुसार सदर कामी मक्तेदाराकडुन निविदा रक्कमेच्या एकूण ४% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्याचे प्रावधन आहे. त्यानुसार सदर कामी मक्तेदार यांचे कामापोटी एकुण रक्कम रु७,६७,४६,२००/- मात्र अनुज्ञेय आहे सदर अनामत कपात करुन जमा होती. कोवीड कालावधीत शासन परीपत्रक दि.२१/०१/२०२१ मधील निर्देशांनुसार रक्कम रु.२,७४,८६,४०६/- सुरक्षा अनामत जमा असल्याचे लेखा विभागाने कळविले आहे.

सदर कामी निविदा प्रपत्रातील कलम २ मधील निर्देश वजा सुचनांनुसार सदर कामाची सुरक्षा अनामत रक्कम अंतिम देयकासोबत परतावा करता येईल, मात्र यावेळी कामासाठी नियोजित असलेला दोष निवारण कालावधी संपलेला पाहिजे. जर सदर कालावधी संपलेला नसेल, तर सुरक्षा अनामत रक्कमेच्या ९०% रक्कम परतावा करता येईल, मात्र मक्तेदारास सुरक्षा अनामत रक्कमेच्या ५०% एवढ्या रक्कमेची बँक हमी ५ वर्षे कालावधीसाठी जमा करावी लागेल तसेच उर्वरीत १०% सुरक्षा अनामत रक्कम दोष निवारण कालावधी संपल्यानंतर परतावा करता येईल असे प्रावधान आहे.

दोष निवारण कालावधी बाबत उपांग / काम निहाय खालील प्रमाणे तरतुदी आहेत.

**निविदा कॉलम — २० पृष्ठ क्र. ७०**

१. Pumping Machinery

a) Pumping Machinery and other allied mechanical, electrical installation (excluding those in the treatment plant contract), Surge arrestors, Water hammer control devices chlorinators (excluding those provide in the treatment plant contract.

| | |
|---|---|
| | Five Years |
| Repairs to the works at (a) above | Five Years |
| २.WTP/ESR/GSR/BPT, Sump and Pump House, Balancing Tank Etc Head Works, approach bridge | |
| a) Based on Contractor's own design | Five Year |
| b) Based on Departmental design | Five Year |
| c) Special repairs to ESR/GSR/BPT | Five Year |
| d) Ordinary repairs to ESR/GSR/BPT sump and pump House etc | Five Year |
| ३. Pipe Lines | |
| i) Pumping Mains, Gravity Mains, Leading Mains including all the fixtures | Five Year |
| ii) Distribution System, laterals, branch sewers of sewerage system etc | Five Year |
| iii) Repairs to pipe lines under the works at (a) and (b) above | Five Year |

पूर्ण झालेल्या योजनेच्या कामांत मुख्य जलवाहीन्या, पाण्याच्या उंच टाक्या, भुमिगत टाक्या, वितरण वाहीन्या या कामांचा समावेश होता, सदर कामांसाठी ०५ वर्षे दोष निवारण कालावधी आहे. सदर कामी मागणी नुसार सुरक्षा अनामत रक्कम रु. ७,६७,४६,२००/- मात्रच्या ५०% रक्कमेची रक्कम रु.३,८३,७३,१००/- मात्रची राष्ट्रीयकृत बँकेची दिनांक ३०/१०/२०२९ वैधता कालावधी असलेली विना अटीशर्तीची बँक हमी मक्तेदाराकडुन घेणे अनिवार्य राहील व तदनंतर

| | |
|---|---|
| एकुण सुरक्षा अनामत | रक्कम रु. ७,६७,४६,२००/- |
| वजा (१०% रक्कम राखीव रक्कम) | रक्कम रु. ७६,७४,६२०/- |
| यापूर्वी अदा केलेली रक्कम | रक्कम रु. २,७४,८६,४०६/- |
| जमा सुरक्षा अनामत पैकी देय होणारी रक्कम | रक्कम रु. ४.१५,८५,१७४/- |

तरी बँक हमी प्रत जमा करुन सुरक्षा अनामत रक्कम रु. ४,१५,८५,१७४/- मात्र परतावा करणेस महासभा / प्रशासक पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याने महासभा / प्रशासक ठराव मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-०९** **प्रशासक ठराव क्र.:-३१४** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. उपअभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./पा.पु.विभाग/१२४/२०२५-२६ दि.१८/०८/२०२५

३. उपअभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचा दि.११/०८/२०२५ चा अभिप्राय

४. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.१८/०८/२०२५ चा अभिप्राय.

५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१८/०८/२०२५ चा अभिप्राय.

६. आयुक्त यांचा दि.१८/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** सावखेडा शिवारातील सिंहगड व्हीलाज सोसायटीस जळगाव शहर महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी त्यांचे कडील पत्र क्र. दंडप्र/०५/निवेदन/कावी/२०२५ दिनांक ०२/०७/२०२५ अन्वये व उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद उपविभाग जळगाव यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र. ग्रापापूउपवि/जळगाव/तांत्रिक/आरआर/९४/२०२५ दि. २४/०६/२०२५ अन्वये सावखेडा शिवारातील सिंहगड व्हीलाज सोसायटीस जळगाव शहर महानगरपालिकेकडून पाणी पुरवठयाची सोय होऊन मिळणे बाबत कळविलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०६.०८.२०२५ रोजी सावखेडा शिवारातील सिंहगड व्हीलाज सोसायटी येथे स्थळ पाहणी करणेत आली. सद्यस्थितित सदर भागास ग्रामपंचायत च्या. जि.एस. आर. मधून पाणी पुरवठा केला जातो. परंतु हा भाग अस्तित्वातील जि.एस. आर. पेक्षा उंचावर असल्याने पुरेश्या दाबाणे व नियमित पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय सावखेडा यांनी सदर सोसायटीस जळगाव शहर महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा होणे संदर्भात विनंती केलेली आहे व तसा त्याबाबतचा ना हरकत दाखला सोबत जोडलेला आहे.

सिंहगड व्हीलाज सोसायटी मध्ये एकूण ६० मालमत्ता धारक वास्तव्यास आहेत. त्याकरिता १३५ एल.पी.सी.डी. प्रमाणे ६० मालमत्ताधारकांना एकूण ६०x४x१३५ = ३२४०० लिटर/प्रति दिवस पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आहे. त्या कामी त्यांना ९० मीमी व्यासाचे नळ संयोजन मीटर पद्धतीने पाहिजे आहे. सदरच्या मागणीनुसार अमृत योजनेअंतर्गत पठाण बाबा चौकाजवळ टाकण्यात आलेल्या १८० मिमी व्यासाच्या जलवाहिनीवर सदरचे ९० मिमी व्यासाचे नळ संयोजनाची जोडणी करणे उचित होईल जेणेकरून सदर सोसायटीस मीटर पद्धतीने पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येईल.

वरील प्रमाणे मीटर पद्धतीने पाणीपुरवठा करण्यासाठी ९० मीमी व्यासाचे आधुनिक पद्धतीचे वॉटर मीटर घेऊन त्याची चाचणी औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून करून घ्यावी लागेल. जळगाव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक ४८९ दिनांक २०/०२/२०१० नुसार मीटर पद्धतीने मनपा हद्दीबाहेरील निवासी नळ जोडणी करिता प्रति क्युबिक मीटर म्हणजेच प्रति १००० लिटर साठी १५ रुपये दर ठरवून दिलेला आहे. त्याप्रमाणे मासिक बिल आकारणी करता येईल. तसेच नळसंयोजन जोडणी कामी आवश्यक साहित्य जसे एच.डी.पी.ई. पाईप, फिटिंग्स, वॉटर मीटर ( प्रमाणित दाखले सहित) इत्यादी साहित्य पुरविण्याची जबाबदारी सदर सोसायटीची राहील. सदरचे कामी रक्कम रुपये ५०० चे स्टॅम्प पेपरवर खालील अटी शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक राहिल.

**करारनाम्यात नमूद करावयाच्या अटी शर्ती -**

१) नवीन जलमापक यंत्र बसविण्याआधी जलमापक यंत्र म.औ. वि. महामंडळ अधिकृत शासकीय संस्थेकडून तपासणी करुन आणावे लागेल. जलमापक यंत्राचा तपासणी अहवाल उप अभियंता पा. पू. विभाग यांचेकडे द्यावा लागेल. दर सहा महिन्यांनी जलमापक यंत्र म.औ. वि. महामंडळाकडून तपासावे लागेल.

२) ज्या ज्या वेळी जलमापक यंत्र मंद गतीने फिरत आहे असे वाटल्यास तात्काळ जलमापक यंत्र म.औ. वि. महामंडळ अधिकृत शासकीय संस्थेकडून तपासणी करावी लागेल.

३) पाईप लाईनवर बसविलेले जलमापक यंत्र सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी सिंहगड व्हीलाज सोसायटीची राहील.

४) जर जलमापक यंत्र नादुरुस्त झाल्यास, खराब झाल्यास अथवा तुटल्यास मागील महिन्याच्या सरासरी रिडिंग प्रमाणे पहिल्या व दुसऱ्या महिन्यात पाण्याचे बिल दिले जाईल. त्याच प्रमाणे मिटर दुरुस्त न झाल्यास तिसऱ्या व चौथ्या महिन्यात सरासरी मिटर रिडींगवर ५०% दंड आकारण्यात येईल व त्यानंतर सुध्दा मिटर दुरुस्त न झाल्यास पाचव्या व सहाव्या महिन्यात सरासरी रिडींगवर १००% दंड आकारण्यात येईल व मिटर दुरुस्त न झाल्यास सहा महिन्यानंतर नळ संयोजन बंद करणेत येईल.

५) वेळोवेळी पाणी पट्टी चा दर ठरविण्याचा अधिकार ज.श.म.न.पा.चा राहील. ठरविलेला दर सिंहगड व्हीलाज सोसायटीस बंधनकारक राहील.

६) ९० मी.मी. पाईप लाईन देखभाल व दुरुस्ती सिंहगड व्हीलाज सोसायटीस बंधनकारक राहील.

७) ज्यावेळी मनपाच्या पाणी पुरवठयात काही कारणाने व्यत्यय आल्यास त्यावेळी सिंहगड व्हीलाज सोसायटीस त्यांचे स्तरावर पाण्याची व्यवस्था करावी लागेल.

८) सिंहगड व्हीलाज सोसायटीस मुख्य पाईपलाईनीस इले. पंप बसवून पाणी घेता येणार नाही. मुख्य पाईप लाईन व्दारे येणारे पाणी भूमिगत टाकी मध्येच घ्यावे लागेल.

९) सिंहगड व्हीलाज सोसायटीची पाणी पुरवठ्याची वेळ निश्चित करण्याचा अधिकार महानगरपालिका यांचा राहील.

१०) सिंहगड व्हीलाज सोसायटीस सुरक्षा अमानत रक्कम रु. १,०६,९२० /- मात्र तसेच माहे सप्टेंबर २०२५ ते माहे मार्च २०२६ पर्यन्त (७ महिन्यांचे) चे पाणी पट्टीचे आगाऊ देयक रक्कम रु. ६२३७०/- मात्र भरणे बंधनकारक राहील. तदनंतर, पाणीपट्टीचे वार्षिक देयक वर्षाच्या सुरुवातीलाच भरणे बंधनकारक राहील. यापेक्षा पाणी बिल जास्त आल्यास (वॉटर मीटर प्रमाणे) ते अधिक बिलातील फरक व पुढील वर्षाचे बिल एकत्रित भरावे लागेल. देयक दिल्यानंतर १५ दिवसाचे आत पाणी पाणीपट्टीचे देयक भरावे लागेल.

११) पाणी पट्टीचे देयक दिल्यानंतर १५ दिवसाच्या आत पाणीपट्टीचे देयक न भरल्यास विलंब शुल्क आकारण्याचा अधिकार महानगरपालिका यांचा राहील.

१२) सिंहगड व्हीलाज सोसायटीस नळ संयोजन बंद करावयाचे असल्यास नळ संयोजन बंद फी व पाणीपट्टीचे बाकीसह संपूर्ण देयक भरल्यानंतर नळ संयोजन बंद करण्यात येईल.

१३) जळगांव शहर महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या पाणीपुरवठ्याचे नियम व अटी शर्ती सिंहगड व्हीलाज सोसायटीस लागू राहतील.

१४) जळगांव शहर महानगरपालिका व सिंहगड व्हीलाज सोसायटी यांच्यात कोणत्याही बाबतीत वाद झाल्यास आयुक्त जळगांव म.न.पा. यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील व तो निर्णय सिंहगड व्हीलाज सोसायटीस बंधनकारक राहील.

१५) सिंहगड व्हीलाज सोसायटीस पाणी पुरवठा करत असताना जर महानगरपालिका क्षेत्रातील भागात पाणी पुरवठा करता येत नाही किंवा करणेस अडचणी निर्माण झाल्यास वा असे निदर्शनास आल्यास सिंहगड व्हीलाज सोसायटीचे कनेक्शन तात्काळ बंद करण्यात येईल व कनेक्शन घेणेकामी झालेल्या खर्चाचा मोबदला मिळणार नाही.

तरी सदर सोसायटीस ९० मीमी व्यासाचे अमृत नळसंयोजन देणे करिता वरील प्रमाणे करारनामा करून घेणेस व नळ संयोजन शुल्क रक्कम भरणा करणेस सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०१ नुसार महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र.:-३१५** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/४०अ/२०२५-२६ दि.२८/०७/२०२५

३. सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा दि.११/०६/२०२५ अभिप्राय.

४. उपायुक्त यांचा दि.१४/०७/२०२५ चा अभिप्राय.

५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१६/०७/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि.२४/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागाकडील आवश्यकतेनुसार व मागणी लक्षात घेता पा.पु.विभाग- टाटा ७०९ – ०१ नग, मलेरिया विभाग- टाटा एस-०१ नग, बांधकाम विभाग- पॉट व्होल मशिन-०१ नग, अग्निशमन अधिकारी- बोलेरो-०१ नग, विदयुत विभाग- लहान इलेक्ट्रीक लॅडर वाहन-०१ नग या प्रमाणे असे एकुण ०५ नग वाहने खरेदी करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय सेवेत आज रोजी एकूण १२ वाहने कार्यान्वीत आहेत (मारुती सुझुकी कंपनीचे ०१ ग्रॅन्ड व्हिटारा, ०२ सियाज, ०२ फ्रॉक्स. ०१ स्विफ्ट डिझायर, ०४ नविन स्विफ्ट डिझायर, ०१ टाटा टिगोर, ०१ महिंद्रा बोलेरो इ.) प्रशासकीय सेवेमधील कामकाजामध्ये वाहानाअभावी विलंब व व्यत्यय निर्माण होत असल्याने व वाहनाच्या कमतरतेमुळे पर्यायी वाहनाची व्यवस्था करुन देणे ही वाहन विभागामार्फत शक्य होत नाही, सदर बाबींमुळे अधिकारी वर्गामार्फत तिव्र नाराजी वेळोवेळी व्यक्त केलेली आहे.

महानगरपालिके अंतर्गत प्रशासकीय सेवेत आज रोजी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (सा.प्र.), उपायुक्त (महसूल), उपायुक्त (समाजकल्याण), सहा.आयुक्त, नगररचनाकार, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक असे शासकीय अधिकारी वर्ग प्रशासकीय सेवेत कार्यरत असून त्यांच्याकडे विविध विभागाचे कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. संबंधीत अधिका-याकडे कार्यरत वाहनाचा तपशील खालील प्रमाणे:-

| अ.क्रं. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | कार्यरत कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | MH 19 EG 0907 | CIAZ | मा. आयुक्त |
| 2 | MH 19 EG 0903 | GRAND VITARA | मा. अतिरिक्त आयुक्त |
| 3 | MH 19 DV 8040 | TATA TIGOR EV | मा. उपायुक्त (सा.प्र) |
| 4 | MH19 EP 1434 | SWIFT DZIRE | माः उपायुक्त (महसूल) |
| 5 | MH 19 EP 1439 | SWIFT DZIRE | मा. उपायुक्त (सा.क) |
| 6 | MH 19 EG 0904 | CIAZ | मा. मुख्यालेखा परिक्षक |
| 7 | MH 19 EG 0905 | FRONX | मा. मुख्यलेखा अधिकारी |
| 8 | MH 19 EG 0906 | FRONX | मा.नगररचनाकार |
| 9 | MH 19 EP 1440 | SWIFT DZIRE | मा. सहा. आयुक्त (वाहन) |
| 10 | MH 19 EP 1441 | SWIFT DZIRE | मा. सहा. आयुक्त |
| 11 | MH 19 M 7474 | SWIFT DZIRE | मा. सहा. आयुक्त (आरोग्य) |
| 12 | MH 19 CU 7197 | BOLERO | मा.शहर अभियंता |

प्रशासकीय सेवा गतिमान होणे कामी प्रशासकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी स्थळपाहणी, नागरीक समस्या सोडविणे कामी शहरात ठिकठिकाणी भेटी देणे, शासकीय, न्यायालयीन कामकाज तसेच विविध प्रकारच्या शासन स्थरावरील योजनांची माहिती व अंमलबजावणी कामी वाहनांची नितांत आवश्यकता आहे. खाते प्रमुखांच्या बैठकीत वाहना संदर्भात सविस्तर झालेल्या चर्चेनुसार आज रोजी किमान ०६ वाहने प्रशासकीय सेवेत नव्याने घेणे आवश्यक व गरजेचे आहे. अहवाल पाहता व सदयस्थितीत विविध विभागांकडील आवश्यकतेनुसार मागणी लक्षात घेता पा.पु.विभाग टाटा ७०९-०१ नग, मलेरिया विभाग टाटा एस-०१ नग, बांधकाम विभाग पॉट व्होल मशिन-०१ नग, अग्निशमन अधिकारी- बोलेरो ०१ नग, विदयुत विभाग - लहान इलेक्ट्रीक लॅडर वाहन-०१ नग या प्रमाणे वाहन खरेदी करणे आवश्यक वाटते. तरी सदरचे वाहन खरेदी करण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यताकरीता महासभा/प्रशासक यांच्याकडेस सादर.

महानगरपालिका विविध विभागाकरिता एकुण ०५ वाहनांची आवश्यकता असून नविन वाहन खरेदी करणे ही बाब धोरणात्मक असल्याने महासभेची/ प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे. वर नमूद केल्या प्रमाणे पा.पु.विभाग टाटा ७०९-०१ नग, मलेरिया विभाग टाटा एस-०१ नग, बांधकाम विभाग पॉट व्होल मशिन-०१ नग, अग्निशमन अधिकारी बोलेरो ०१ नग, विदयुत विभाग- लहान इलेक्ट्रीक लॅडर वाहन-०१ नग असे एकुण ०५ नग खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या पर्यायी अंदाजे रक्कम रु.१,५०,००,०००/- मात्रच्या खर्चास महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-११** **प्रशासक ठराव क्र.:-३१६** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जशमनपा/८६ /२०२५-२६ दि.१८/०८/२०२५
३. आस्थापना अधिक्षक यांचा दि.०४/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.०६/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.०६/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील समाज विकास विभागांतर्गत मानधन/कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या DAY –NULM विभागातील कर्मचाऱ्यांचे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नियमित समावेशन करणे बाबत.

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगाव शहर महानगरपालिका समाज विकास विभागांतर्गत दि.अं.यो.-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान(DAY-NULM) विभागात कार्यरत दोन शहर अभियान व्यवस्थापक व सहा समुदाय संघटक कंत्राटी तत्वावर कार्यरत असून आयुक्त तथा प्रशासक यांनी पात्र कर्मचारी यांचा प्रस्ताव पाठविणे कामी मंजुरी दिली आहे.

दोन शहर अभियान व्यवस्थापक व सहा समुदाय संघटक याकर्मचाऱ्यांना कायम कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन भत्ते,वैद्यकीय सेवा,लाभ इत्यादी दिले जात नाहीत.मनपा अंतर्गत समाज विकास विभागाकडील विविध कल्याणकारी योजना राबवण्याकरिता सदर प्रशिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृती बंधात समाज विकास विभागात उक्त पदांचा समावेश नाही.त्यामुळे सदर पदांची निर्मिती करणे करीता शासनमान्यतेची आवश्यकता आहे.जळगाव शहर महानगरपालिकेतील समाज विकास विभागाकडील समाज विकास अधिकारी-१ यापदावर श्रीमती.गायत्री कैलास पाटील यांचेकायम स्वरूपी समायोजन करणेस व उर्वरित एक शहर अभियान व्यवस्थापक व सहा समुदाय संघटक यांचे ही कायम स्वरूपी समावेश करणेकामी सदर पदांची आकृती बंधात पद निर्मिती करणेस, सेवा प्रवेश नियम लागू करणेस व सदर पदावर कार्यरत वर नमुद कर्मचारी यांचे समावेशन करणेकामी खालील नमूद करण्यात आलेल्या तक्त्यातील कर्मचाऱ्याकरीता जशमनपा आस्थापनेवर पदांची निर्मिती करून शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांचे समायोजन करणे करिता महासभेची मान्यता प्राप्त झालेनंतर शासनाची मान्यते करीता प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

अ) कार्यरत कंत्राटी कर्मचारी :-

| अं.क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद | शिक्षण |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती.गायत्री कैलास पाटील | शहर अभियान व्यवस्थापक | BSW/MSW/MS-CIT |
| ०२ | श्री.शालिग्राम श्रीराम लहासे | शहर अभियान व्यवस्थापक | B.Com/MSW/MS-CIT |
| ०३ | श्रीमती.कविता ईश्वर पाटील | समुदाय संघटक | BA/MA/MSW/MS-CIT |
| ०४ | श्रीमती.शितल श्रावण कंखरे | समुदाय संघटक | BSW/MSW/MS-CIT |
| ०५ | श्री.अमोल सुधाकर भालेराव | समुदाय संघटक | BSW/MSW/MS-CIT |
| ०६ | श्री.राहुल मोहन बडगुजर | समुदाय संघटक | BSW/MSW/MS-CIT |
| ०७ | श्री.नितीन हिरालाल जोशी | समुदाय संघटक | BSW/MSW/MS-CIT |
| ०८ | श्री.अब्बास साहेबु तडवी | समुदाय संघटक | BSW/MSW/MS-CIT |

ब) नवनिर्मिती करिता आवश्यक पदांचा तपशील तक्ता :-"ब"

| अं. क्र. | पदनाम व श्रेणी | पद संख्या | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | वेतन श्रेणी | अहर्ता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शहर अभियान व्यवस्थापक | ०१ | नामनिर्देशन/ सरळ सेवा १००% | S-१३ ३५,४००- १,१२,४०० | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी तसेच(MSW) समाजकार्यातील पदवीउत्तर पदवी, MS-CIT, व नामांकित शासकीय अथवा निमशासकीय कोणत्याही सामाजिक संस्थेत ३ वर्षाचा अनुभव. |
| ०२ | समुदाय संघटक | ०६ | नामनिर्देशन/ सरळ सेवा १००% | S-८ २५,५००- ८१,८०० | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी तसेच(BSW/ MSW) समाजकार्यातील पदवी उत्तर पदवी असल्यास प्राधान्य MS-CIT,व नामांकित शासकीय अथवा निमशासकीय कोणत्याही सामाजिक संस्थेत ३ वर्षाचा अनुभव. |

श्रीमती गायत्री कैलास पाटील, शहर अभियान व्यवस्थापक यांचे दि.०४/०६/२०२५ रोजीच्या विनंती अर्जानूसार खालील प्रमाणे मंजूर पदावर समावेशन करणेस सदर आकृती बंधात मंजूर पदाची माहिती पुढील प्रमाणे. तक्ता क्र. :- "क'

| अं. क्र. | पदनाम व श्रेणी | पद संख्या | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | वेतन श्रेणी | ग्रेड वेतन | अहर्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | समाज विकास अधिकारी (श्रेणी ब आरोग्य सेवा) | ०१ | नामनिर्देशन/ सरळ सेवा १००% | ९३००- ३४८०० | ४४०० | अ)मान्यताप्राप्त विद्यापिठाची MSW पदवीउत्तर ब) मराठी भाषेसह शालांत परीक्षा उत्तीर्ण आवश्यक क) जळगाव शहर महानगरपालिकेतील किमान ५ वर्ष सेवा झालेल्या शैक्षणिक अहर्ता प्राप्त कर्मचाऱ्याबाबतीत सरळ सेवेसाठी निर्धारित उच्चोत्तम वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल राहील. |

वरील तक्ता क्र.ड मधील जळगाव शहर महानगरपालिका आस्थापना सूचीवर मंजूर असलेल्या समाज विकास अधिकारी या पदावर श्रीमती. गायत्री कैलास पाटील यांचे समावेशन करणेस व तक्ता क्र. ब मधील अनुक्रमांक.०२ श्री.शालिग्राम श्रीराम लहासे यांचे करिता शहर अभियान व्यवस्थापक – ०१ पद व अनुक्रमांक ३ ते ८ यांचे करिता समुदाय संघटक - ०६ या पदांची जळगाव शहर महानगरपालिका आस्थापना सूचीवर समाज विकास विभागात पद निर्मिती करून सदर पदावर समावेशन करणेस सादर करणेत आहे

सदरचा प्रस्ताव आयुक्त / प्रशासक यांचे मान्यतेसाठी सादर करणेत येत असून जळगाव महानगरपालिकेतील समाज विकास विभागात "ब" मध्ये नमूद केलेनुसार पदानिर्मिती करणे व त्यानंतर "अ" मधील मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१(४)अन्वये शासनास अधिकार असल्याने मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या "अ" मध्ये नमूद कंत्राटी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत नियमित समावेशन करणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे करिता महासभा/प्रशासकीय ठराव करणेस मान्यता मिळणेसाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-१२** **प्रशासक ठराव क्र.:-३१७** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्रं.०१ ते ०४ यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./प्र.स.क्र.०१ ते ०४/१४००/२०२५-२६ दि.१८/०८/२०२५
३. समन्वय अधिकारी यांचा दि.१२/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१४/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१४/०८/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१४/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत " शहरातील हद्दितील संपुर्ण मालमत्तांचे (जमिनी व इमारती) नोंदणी व GIS आधारित पुन:सर्व्हेक्षण करुन भांडवलीमुल्य निर्धारण पध्दतीने करमुल्यांकन व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी अंदाजीत दर व अंदाजीत अपेक्षीत खर्चास तसेच प्रशासकीय महासभा ठराव क्र.२७३, दि.३०/०४/२०२५ नुसार निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत " शहरातील हद्दितील संपुर्ण मालमत्तांचे (जमिनी व इमारती) नोंदणी व GIS आधारित पुन:सर्व्हेक्षण करुन भांडवलीमुल्य निर्धारण पध्दतीने करमुल्यांकन व इतर अनुषंगीक कामे" करणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी कार्यक्षम व नोंदणीकृत कपंनी / एजन्सीकडून निविदा प्रक्रियेद्वारे बाह्य अभिकर्ता नियुक्त करणे साठी महासभा ठराव क्र.२७३ दि.३०/०४/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याकामी आयुक्त यांचे मान्यतेने याप्रकारचे काम करणाऱ्या खाजगी कंपन्यांकडून दैनिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करुन बाजारमुल्य दरपत्रक (Quotation) मागवीण्यात आलेले होते. त्यानुसार दिलेल्या मुदतीत १) Techs IT Infra, २) Tech ९ Services, ३) Sthapatya Consultants (I)Pvt. Ltd., ४) Abell Electro-Soft Technologies Pvt.Ltd. व ५) Ornet Technologies Pvt. Ltd. या पाच खाजगी कंपन्यांचे दरपत्रक (Quotation) प्राप्त झालेले आहेत. आलेल्या अंदाजित रक्कमेचे खालील नमुद कामांसाठी इतर महानगरपालिका यांचेकडेस सद्यस्थितीत असलेले दर तुलना करणेसाठी मागविण्यासाठी आयुक्त यांचे दिनांक १४/०७/२०२५ चे मान्यतेने उपायुक्त यांचेकडील पत्र जा.क्र.१०४३, दि.१४/०७/२०२५ अन्वये लातुर, अकोला, पनवेल, मिराभाईंदर, मालेगाव, धुळे या महानगरपालिकांना पत्र देण्यात आले होते. पैकी, अकोला महानगरपालिकेकडील पत्र जा.क्र.१०९, दि.२१/०७/२०२५ व पनवेल महानगरपालिकेचे पत्र जा.क्र.१८६७, दि.२१/०७/२०२५ इकडील कार्यालयास ईमेलद्वारे प्राप्त झाले असुन त्यासोबत त्यांनी त्यांचे महानगरपालिकेत संबंधीत कामासाठी दिलेले दरांबाबत माहिती कळविलेली आहे. उक्त प्रमाणे प्राप्त दोनही महानगरपालिकांचे दर व यापुर्वी मुदतीत दि.०९/०७/२०२५ पर्यंत प्राप्त ५ खाजगी कंपन्याचे प्राप्त अंदाजीत दर यांचेपैकी नमुद कामांसाठी सर्वात न्युनतम दर घेऊन व जळगांव शहर महानगरपालिका हद्दितील मिळकतींची असलेली अंदाजीत संख्या (त्या-त्या नमुद कामासाठी) घेऊन येणाऱ्या खर्चाचा तपशिल खालिल परिशिष्ट "अ" व "ब" मध्ये नमुद प्रमाणे आहे.

| Sl. No. | Description of work-Providing Services for survey, re-verification and Computerization for Assessment of property tax on capital value method basic for all properties (Lands & Buildings), Services for Annual Operations & Maintenance and providing survey and services for Municipal assets department within the limits of Jalgaon Municipal Corporation, Jalgaon | अंदाजित नग (संख्या) | Unit | Mimimum Rates (Rs.) | Total |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Property survey and property tax assessment :- Zonal Offices Jurisdiction wise door to door Enumeration and Numbering of properties (Lands & Buildings), door to door property survey Data collection for evaluation and assessment for capital value, Capturing Drone Image, Computerization of all collected data and link all data to software, Providing services** | | | | |
| | **1.1 Re verification, additional data collection and assessment works of properties where no alterations, additional constructions found.** | **110000** | **Per Building unit** | **423** | **46530000** |
| | **1.2 Property Survey, additional data collection and assessment works For the un assessed, newly constructed properties and alteration, modification, and is found in Municipal records.** | **45000** | **Per Building unit** | **775** | **34875000** |
| | **1.3 For all open plots** | **40000** | **Per open plot** | **497** | **19880000** |
| | **1.4 For all Industrial Properties** | **3000** | **Per Building unit** | **8230** | **24690000** |
| 2 | **Providing software executable file licenses and API services for integrated copyright-registered mainframe software to fulfil and execute the following work-<br>1. Mobile application license for property numbering (geo sequencing) and executing surveys using mobile devices for the Property Tax Department.<br>2. Copyright-registered backend software to facilitate the computerization of the entire survey data and assessment work.<br>3. Providing services for Unification of the Existing Computerized municipal database (Building Permission and Water fee management and collection department with property tax and Linking of Property Tax register with state stamp duty and Registration Department/revenue department records and Providing Development and deployment of an Online self-assessment mechanism for property tax** | **1** | **Per Unit** | **15000000** | **15000000** |
| 3 | **Municipal estate management (Lands & Buildings) system - Carrying out survey and computerization work for all immovable and leased assets** | | | | |
| | **11.1 For area up to 500 Sq. mtrs (Lands & Buildings)** | **(Lands & Buildings) 3500** | **Per Municipal asset Unit** | **4302** | **15057000** |
| | **11.2 For area above 500 sq. mtr** | **for lands 500** | **Per Municipal asset Unit** | **3585** | **1792500** |
| | **11.3 For area above 500 sq. mtr** | **for Buildings 100** | **Per Municipal asset Unit** | **5975** | **597500** |
| | **Total Amount** | | | | **158422000** |

## परिशिष्ट "ब"

| Sl. No. | **Description of work-Providing Services for survey, re-verification and Computerization for Assessment of property tax on capital value method basic for all properties (Lands & Buildings), Services for Annual Operations & Maintenance and providing survey and services for Municipal assets department within the limits of Jalgaon Municipal Corporation, Jalgaon** | **अंदाजित नग (संख्या)** | **Unit** | **Mimimum Rates (Rs.)** | **Total** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **1. Providing software executable file licenses and services for property and water tax collection through online, CFC and Mobile based application for door to door property tax collection.<br>2. Providing software for Android and iOS based property tax collection, Service/grievance handling Software interface for Taxpayer<br>3.Providing services for Design, Development, and Deployment of Block chain-Based Property Tax Management** | **1** | **Software License Per Year** | **5899999** | **5899999** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Providing services for Design, Development, and Deployment of What Sapp Chabot Services | 1 | Software License Per Year | 2500000 | 2500000 |
| 3 | Providing services for annual maintenance for APIs mechanism. | 1 | Per Year | 3000000 | 3000000 |
| 4 | Providing services for Annual Operation, maintenance and Supply for the property and water tax dept as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with pre-printed multicolour stationary and maintaining the database, Manpower requirement for Operations & Maintenance, Help Desk/Call Centre etc. as per tender document scope of work for 5 Years | 150000 | Per Property per year | 153 | 22950000 |
| 5 | Data Analytics and Visualization Tool:- Providing services for Dashboard Customization and Deployment, Data Analytics & Visualization, Automated Reporting and Notifications for Property Tax dept | 150000 | Per Property per year | 34 | 5100000 |
| 6 | Providing Software for computerization of the Municipal property asset, Computerization of municipal Rent counter payment and web based municipal asset rent collection | 1 | Software License Per Year | 2395000 | 2395000 |
| 7 | Providing Annual operation & maintenance and Supply for the Municipal asset Rent calculation and collection as providing yearly tax collection postings, Bills of taxes, demand registers and collection register etc with pre-printed multicolour stationary and maintaining the database etc as per tender document scope of work for 5 Year | 4100 | Per Property per year | 199 | 815900 |
| 8 | Maintenance of the property tax and Municipal asset Rent calculation software and the Database, installation-reinstallation as Required by Municipal Corporation, Upgradtion of Software and Database for Consolidation of the Next Financial year for one year | 1 | Per Year | 1668000 | 1668000 |
| 9 | Providing License based data services to maintain and manage data of Jalgaon Municipal Corporation related to property tax, Municipal assets department on agency's data centre for various online activities related to above software and application as a host server and database server as data centre with appropriate backup system at selected agency office | 1 | Per Year | 1238000 | 1238000 |
| | Total Amount | | | | 45566899 |

उपरोक्त परिशिष्ट "अ" आणि "ब" मध्ये नमुद केल्यानुसार न्युनतम दर घेऊन् अंदाजीत दर (Estimated Rates) घेऊन प्रस्तुत कामासाठी अंदाजे अनुक्रमे रक्कम रु.१५,८४,२२,०००/- परिशिष्ट "अ" प्रमाणे व रक्कम रु.४,५५,६६,८९९/- परिशिष्ट "ब" प्रमाणे असा एकुण रु. २०,३९,८८,८९९/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच दरवर्षी मालमत्तांच्या संख्येत १० % इतकी नैसर्गीक वाढ गृहीत धरुन जितक्या मालमत्ता नव्याने निर्माण होतील. त्यांचे सर्वेक्षण करुन त्या माहितीचे संस्करण व लिंकींग बाबत मंजुर झालेल्या दरानुसार करण्यात येईल त्यासह उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित अंदाजित खर्चास व प्रशासकीय महासभा ठराव क्र.२७३, दि.३०/०४/२०२५ नुसार ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळण्यासाठी समन्वय अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४१** **(महासभा)**

**विषय क्र.:-१३** **प्रशासक ठराव क्र.:-३१८** **दिनांक :-१९/०८/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त (वाहन) यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/५०/२०२५-२६ दि.११/०८/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (वाहन) यांचा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** आयुक्त यांच्यासाठी प्रशासकीय कामकाजाकरिता ०१ नग इनोव्हा क्रिस्टा वाहन खरेदी करणे बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत विविध विभागाकडील आवश्यकतेनुसार व मागणी लक्षात घेता नविन वाहन खरेदी करणे कामी धोरणात्मक बाब असल्याने आयुक्त यांनी प्रशासकीय कामकाजाच्या अनुषंगाने इनोव्हा क्रिस्टा खरेदी करणे बाबत निर्देश दिले नुसार इनोव्हा क्रिस्टा ०१ नग खरेदी करणेस व शासन निर्णयानुसार वाहनाची खरेदी किंमत ०९ लक्ष पेक्षा जास्त असल्याने वाहन खरेदीच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेवून खरेदी करणेस महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, वाहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**